**पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड**
पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे ३३
**दुरध्वनीक्र.** ०२०-२७३५०१२० ई मेल आयडी- dcphq.pcpc-mh@gov.in

**दिनांक - ३१/०८/२०२४**

## खंडणी विरोधी व औद्योगिक तक्रारी निवारण पथक, गुन्हे शाखेची दमदार कामगिरी

---

### बीड मधील कुटे ग्रुपच्या ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप क्रेडीट सोसायटीच्या ५२ शाखामधील ४.५० लाख ठेवीदारांची ३५१५ कोटींची फसवणुक करुन, ४२ गुन्हयांमध्ये फरार व्हाईस चेअरमन व डायरेक्टर पिता पुत्रांना अटक

आगामी गणेशोत्सवाच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीमधील गंभीर गुन्हयातील पाहीजे / फरारी आरोपीतांचा शोध घेवून, त्यांना अटक करणेबाबत मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी आदेश दिले होते. त्या अनुषंगाने खंडणी विरोधी व औद्योगिक तक्रारी निवारण पथकातील अधिकारी व अंमलदार हे आयुक्तालयातील गंभीर गुन्हयातील पाहीजे / फरार आरोपीतांची माहिती घेत असतांना, पोलीस हवालदार गणेश गिरीगोसावी यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. बीड घोटाळयामधील पाहीजे आरोपी व्हाईस चेअरमन यशवंत कुलकर्णी व डायरेक्टर वैभव कुलकर्णी हे फिनिक्स मॉल वाकड, पुणे येथे येणार असल्याची माहिती मिळाल्याने, खंडणी विरोधी पथकाकडील अधिकारी व अंमलदार यांनी सापळा लावून, १) यशवंत वसंतराव कुलकर्णी वय-५५ वर्षे रा.लेगसी मिल्लेन्नािया सोसायटी, फ्लॅट नं. १२०५, गायकवाडनगर, पुनवाळे, पुणे मुळगाव-शिंदेनगर कॅनॉलरोड, बीड २) वैभव यशवंत कुलकर्णी वय-२४ वर्षे रा. सदर यांना ताब्यात घेवुन, खंडणी विरोधी व औद्योगिक तक्रारी निवारण पथक कार्यालय येथे आणले. आरोपीकडे विचारपुस करता, आरोपीतांविरुध्द वेगवेगळ्या ठिकाणी एकुण ४२ गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपीतांना पुढील कार्यवाहीकामी मा.पोलीस उप-अधिक्षक सो, बीड शहर अतिरिक्त कार्याभार आर्थिक गुन्हेशाखा, बीड यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

**सदर आरोपींविरुध्द वेगवेगळ्या ठिकाणी एकुण ४२ गुन्हे दाखल असून, आरोपी क्र. १ यास पकडून देणाऱ्यास रोख बक्षीस जाहीर करण्यात आलेले होते.**

सदरची कारवाई मा.श्री. विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. डॉ.शशिकांत महावरकर पोलीस सह-आयुक्त, मा. श्री.वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त, मा. श्री.संदिप डोईफोडे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, मा. श्री.बाळासाहेब कोपनर, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली, खंडणी विरोधी व औद्योगिक तक्रारी निवारण पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण, पोउपनि सुनिल भदाणे, सपोउनि अमर राऊत, पोलीस अंमलदार गणेश गिरीगोसावी, सुनिल कानगुडे, किरण काटकर, किशोर कांबळे, भुपेद्र चौधरी, प्रदीप गायकवाड यांचे पथकाने केली आहे.

**(संदिप डाईफोडे)**
**पोलीस उप-आयुक्त,**
**गुन्हे, पिंपरी चिंचवड**